# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(पुर्वीचे सोलापूर विद्यापीठ) (Formerly Solapur University)

NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA-2.62)

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)

Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in

ईमेल - dbee@sus.ac.in ● परीक्षा व मूल्यमापन विभाग ● विस्तारीत क्रमांक - १३०


जा.क्र.पुअहोसोविसो/पवमूमं/मध्यवर्ती मूल्यमापन विभाग/ 891 दि. 10 APR 2024

## परिपत्रक — 26

संलग्नित सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे/पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे परीक्षा केंद्र असलेले महाविदयालये/संकुले यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, माहे मार्च / एप्रिल-२०२४ सत्राची परीक्षा १५ एप्रिल २०२४ पासुन सुरु होत आहेत.

माहे मार्च / एप्रिल-२०२४ च्या उपरोक्त अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिकेचे Onscreen Evaluation करण्यात येणार आहे. या सर्व उत्तरपत्रिकेचे Scanning **एन.बी.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग केगांव,सोलापूर** या महाविदयालयात करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे / पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे परीक्षाकेंद्र असलेल्या महाविदयालयांनी त्यांच्या केंद्रावरील सर्व पेपर हे सिलबंद करुन प्रत्येक पेपरच्या दुसऱ्या दिवशी University Scanning Centre (**एन.बी.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगांव**) सेंटरवर जमा करावेत. हे पेपर जमा करत असताना खालील बाबींची तपासणी करुनच उत्तरपत्रिका जमा करुन घेतल्या जातील.

१. महाविदयालयाचे उत्तरपत्रिका जमा करण्याबाबतचे पत्र असावे. तसेच सदर पत्रामध्ये कोर्सवाईज,सेमिस्टरवाईज विदयार्थी संख्या असावी.
२. विदयार्थी उपस्थिती अहवाल Junior Supervisor Report ( Present/Absent report) दोन प्रतीत दयावा. त्यापैकी एक प्रत उत्तरपत्रिकेच्या गठठयावर व दुसरी प्रत महाविदयालयाच्या पत्रासोबत जमा करावी.
३. सर्व उत्तरपत्रिकाची मोजणी करुन उत्तरपत्रिका जमा झाल्याबाबत पोहोच घेणे.
४. कॉपीकेस चा अहवाल स्वतंत्रपणे दोन्ही उत्तरपत्रिकासह विदयापीठाकडे जमा करावा तो Scanning Centre ला जमा करु नये.

५. उत्तरपत्रिकेवरील पहील्या पानावरील पुर्ण माहिती भरली असल्याचे खात्री करावी. तसेच सदरील माहिती पुर्ण भरण्याबाबत ज्युनियर सुपरवाईजर यांना सुचना देण्यात यावे.

वरील सुचनेनुसार प्रत्येक परीक्षाकेंद्रानी अंमलबजावणी करणे आवश्यक असून यामध्ये काही चूका आढळल्यास त्यास वरिष्ठ पर्यवेक्षक, परीक्षेशी संबंधित कर्मचारी व प्राचार्य यांची जबाबदारी रहिल. त्या परीक्षा केंद्राच्या उत्तरपत्रिका जमा करुन घेण्यात येणार नाहीत याची सर्व प्राचार्यांनी व संबंधितांनी नोंद घ्यावी.

तसेच वरील सूचनांचे पालन करुन उत्तरपत्रिका वेळेत परीक्षा केंद्राच्या Scanning Centre एन.बी.एन.सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग केगांव, सोलापूर. येथे पोहोच करव्यात.

10/05/23

डॉ. श्रीकांत ग. अंधारे
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ